राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रशासकीय प्रशिक्षणासाठी लेखाशीर्ष (२०७० ०८५३), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) याखाली निधी वितरीत करणेबाबत (दुसरा हप्ता)

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः टीआरएन-२०२६/प्र.क्र.५०/प्रशि-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०२६

वाचा :-

१. **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.९.२०११.**
२. **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआरएन-२०२३/प्र.क्र.६६/२३/१२-अ, दि.२७.०९.२०२३.**
३. **शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.**
४. **शासन निर्णय क्रमांकः टीआरएन २०२६/ प्र.क्र.५०/प्रशि-४, दिनांक २०.०७.२०२६**
५. **शासन निर्णय क्रमांकः टीआरएन २०२६/ प्र.क्र.५०/प्रशि-४, दिनांक १६.०९.२०२६**
६. **महासंचालक, यशदा पुणे यांचे पत्र क्र. राप्रनिमूयं/२०२६-२७/आर्थिक तरतुद/ प्र.क्र.०१-४५, दि.२३.०९.२०२६ .**
७. **महासंचालक, यशदा पुणे यांचे पत्र क्र. प्रप्रसं/भाप्रसे/तुकडी २०२४-२०२५/२१९, दिनांक २२.०७.२०२६**

प्रस्तावना :-

राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रशासकीय प्रशिक्षणाच्या खर्चाकरिता मागणी क्र. ए-४, लेखाशीर्ष (२०७० ०८५३) ३१- सहायक अनुदाने(वेतनेतर) या उद्दिष्टाखाली प्रशिक्षणार्थींच्या प्रशासकीय प्रशिक्षणासाठी रु.३१.६८ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. संदर्भ क्र.४ अन्वये सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या प्रशासकीय प्रशिक्षण आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आता यशदाने उपरोक्त संदर्भाधीन क्र. ६ च्या पत्रान्वये यशदा, पुणे यांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या प्रशिक्षणार्थींच्या प्रशासकीय प्रशिक्षणासाठी माहे जुलै, २०२६ ते माहे ऑगस्ट, २०२६ पर्यंत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणांचा तपशिल सादर केला आहे. तसेच संदर्भाधीन क्र. ७ च्या पत्रान्वये सन २०२५-२६ व सन २०२६-२७ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील सन २०२४ ची तुकडी व सन २०२५ च्या तुकडीतील अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी झालेल्या खर्चाची मागणी यशदा,पुणे यांनी केली आहे.

त्यानुसार प्रशिक्षण संस्थांना प्रशिक्षण खर्चासाठी निधी वितरित करण्याची बाब विचाराधीन आहे .

शासन निर्णय:-

राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा, तसेच ७ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना माहे जुलै, २०२६ ते माहे ऑगस्ट, २०२६ करीता प्रशासकीय प्रशिक्षण आयोजनाच्या खर्चासाठी खालील विवरणपत्रात नमूद केल्यानुसार रु.१,१९,५५,०००/- (यशदा) +रु.५,३०,३७,०००/- (७ विभागीय प्रशासकीय

प्रशिक्षण संस्था) + रु.२८,५१,२००/- जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था असा **एकूण रु.६,७८,४३,२००/- (अक्षरी रुपये सहा कोटी अठ्ठयात्तर लाख त्रेचाळीस हजार दोनशे फक्त)** इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरून यशदा, पुणे यांना वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सन २०२६-२७ प्रशिक्षण खर्च तपशिल						
अ.क्र.	**प्रशिक्षण प्रकार**	**कालावधी**	**प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी दर**	**साध्य**	**प्रशिक्षण दिवस**	**खर्च**
(अ) यशदा स्तरावरील प्रशासकीय प्रशिक्षण कार्यक्रम						
१	पायाभूत प्रशिक्षण संवर्ग अ	३०	२५००	८९	३८७०	६६७५०००
२	पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण	१२	२५००	१७६	२३२८	५२८००००
३	उजळणी	५	२५००	०	०	०
४	प्रशिक्षकांचे प्रशिक्षण	३	२५००	०	०	०
एकुण (यशदा)				**२६५**	**६१९८**	**११९५५०००**
(ब) विभाग स्तरावरील प्रशासकीय प्रशिक्षण कार्यक्रम						
१	पायाभूत प्रशिक्षण संवर्ग ब	३०	१८००	२००	७५९०	१०८०००००
२	पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण ब	१२	१८००	५७२	१०८९६	१२३५५२००
३	उजळणी प्रशिक्षण संवर्ग ब	५	१८००	०	०	०
४	पायाभूत प्रशिक्षण संवर्ग क	१२	१८००	७२१	१३६९२	१५५७३६००
५	पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण संवर्ग क	१२	१८००	५७२	४७७६	१२३५५२००
६	उजळणी प्रशिक्षण संवर्ग क	५	१८००	२१७	७३०	१९५३०००
एकुण (विभागीय प्रशिक्षण संस्था)				**२२८२**	**३७६८४**	**५३०३७०००**
(क) जिल्हा स्तरावरील प्रशासकीय प्रशिक्षण कार्यक्रम						
१	**पायाभूत प्रशिक्षण संवर्ग ड**	६	१२००	३८६	८२२	२७७९२००
२	**उजळणी प्रशिक्षण संवर्ग ड**	३	१२००	२०	५७	७२०००
एकुण (जिल्हा प्रशिक्षण संस्था)				**४०६**	**८७९**	**२८५१२००**
एकूण				**२७०३**	**४४७६१**	**६७८४३२००**

तसेच ,सन २०२५-२६ व सन २०२६-२७ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील सन २०२४ ची तुकडी व सन २०२५ च्या तुकडीतील अधिकाऱ्यांसाठी यशदा येथे प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनाच्या खर्चासाठी संदर्भ क्र. ७ अन्वये केलेल्या मागणीनुसार **एकूण रु.४३,८०,५००/- (अक्षरी त्रेचाळीस लाख ऐंशी हजार पाचशे)** इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरून यशदा, पुणे यांना वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त विवरणपत्रात नमूद केल्यानुसार माहे जुलै ते ऑगस्ट २०२६ या कालावधीतील राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत प्रशिक्षणासाठी झालेला खर्च **रु.६,७८,४३,२००/-** व भा.प्र.से. अधिकारी यांचेकरीता प्रशिक्षण कार्यक्रमासाठी झालेला खर्च **रु.४३,८०,५००/- असे एकूण रुपये ७,२२,२३,७००/- (अक्षरी रुपये सात कोटी बावीस लाख तेवीस हजार सातशे फक्त)** इतका निधी "मागणी क्र. ए-४, २०७०-इतर प्रशासकीय सेवा ०० -

००३ - प्रशिक्षण ०० - १० - राज्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विविध सुविधा व सहाय यावरील खर्च (२०७० ०८५३) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर अर्थसंकल्पिय अनुदानातून भागविण्यात येईल.

३. सदरहू मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची संबंधित कोषागारातून काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. यशदा, पुणे या संस्थेने उपरोक्त अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर यांना राहतील व त्याकरिता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करून देईल.

५. यशदा, पुणे या संस्थेने वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. ८ मध्ये नमूद केल्यानुसार देयक कोषागार अधिकारी यांना सादर करताना संस्थेचे मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) देयकासोबत जोडण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. ६३०/व्यय-४, दि. २७.१०.२०२६ अनुसार निधी वितरीत करण्यास मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे. तसेच वित्त विभाग शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६. नुसार विहित केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने तसेच सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११०६१३२४०३५८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NAMRATA SHASHANK BHARSAKHALE

Digitally signed by NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=AFC239A04F8765FDFAFF5B427B95A52F52390A276568759DF519AEA12578512C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7A55E217A5A7B81D43819C528413DCC573FB455C923C289F62184B4155ED280, cn=NAMRATA SHASHANK BHARSAKHALE
Date: 2026.11.06 13:26:26 +05'30'

(नम्रता भारसाखळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (सेवा), यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
३. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
४. उपमहासंचालक, राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
५. संचालक, राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मूल्यमापन यंत्रणा, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
६. लेखा अधिकारी, यशदा, पुणे.
७. सह सचिव (भाप्रसे), सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई-३
८. अवर सचिव, नियोजन विभाग, १४४३, मंत्रालय, मुंबई -३२.
९. अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-४/ अर्थसंकल्प-१४) मंत्रालय, मुंबई -३२.
१०. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग / कार्यासन -२५.
११. संचालक / प्राचार्य, सर्व विभागीय व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था.
१२. निवड नस्ती, कार्यासन/प्रशि-४.